पेट्रोल / डिझेल पंप उभारणीसाठी पंप धारकांकडून "बँकेचे हमीपत्र" (Bank Guarantee) घेण्याबाबत व अनधिकृत जोडरस्ता बांधणा-या पेट्रोल / डिझेल पंप चे परवाने रद्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक -आरबीडी-२००५/प्र.क्र. ८१ /रस्ते-७
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक - २६ जुलै, २००५

प्रस्तावना

राष्ट्रीय महामार्ग /राज्य मार्ग/प्र.रा.मा./प्र.जि.मा. इ. मार्गालगत पेट्रोल / डिझेल पंप उभारणीसाठी "पेट्रोल / डिझेल पदार्थ विक्रीचा परवाना" जिल्हाधिकारी यांचेकडून देण्यांत येतो. सदर परवाना प्राप्त झाल्यानंतर पंपधारकाने महामार्गावरुन जोडरस्ता घेण्यासाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करुन राष्ट्रीय महामार्गकरीता केंद्रीय भुतल व परीवहन मंत्रालय, नवी दिल्ली व राज्यातील रस्त्याकरीता राज्य शासन यांचेकडून जोडरस्त्याची परवानगी प्राप्त करुन घेणे आवश्यक असते. तथापी शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, वर विषद केलेली कार्यवाही पूर्ण न करता बहुतांशी पंपधारक परवानगी मिळण्यापुर्वीच जोडरस्त्याचे बांधकाम करुन पंप कार्यान्वीत करतात किंवा मंजूर नकाशाप्रमाणे पेट्रोलपंपाचे बांधकाम करीत नाही.

राष्ट्रीय महामार्ग /राज्य मार्ग/प्रमुख राज्यमार्ग/ प्रमुख जिल्हामार्ग/ग्रामीण मार्गावर., ऑप्टिकल फायबर केबल टाकणेसाठी "बँक गॅरंटी" घेण्यात येते. सदर बँक गॅरंटी अटी व शर्तीचे योग्य प्रकारे पालन होण्याच्या हेतूने घेण्यात येते. याच धर्तीवर पंपधारकाकडून "बँक गॅरंटी" घेण्याचे व अनधिकृत जोडरस्ता बांधल्यास जिल्हाधिकारी यांचेकडून दिलेला परवाना रद्द करून घेण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधिन होता.

परिपत्रक

जिल्हाधिकारी यांच्या कडून पेट्रोल / डिझेल पंप उभारण्यासाठी परवाना व जिथे पेट्रोलपंप बाधण्यात येणार आहे त्या जागेकरीता वाणिज्यिक वापराचा परवाना मिळाल्यानंतर पंपाकरीता जोड रस्ता बांधण्याबाबत प्रमुख राज्यमार्ग, राज्य मार्ग, प्रमुख जिल्हामार्ग, इतर जिल्हामार्ग व ग्रामीण मार्गाकरीता राज्य शासन यांचेकडून परवानगी करीता अर्ज करताना पंपधारकाने अर्जासोबत रु.५.०० लक्ष एवढया रकमेची बँक गॅरंटी संबधीत कार्यकारी अभियंता यांच्या नावे जमा करणे आवश्यक आहे. राज्य शासनाची परवानगी प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावातील मंजूर नकाशानुसार संबधीत कार्यकारी अभियंता अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या

(क्र.मा.प.

अधिका-याच्या मार्गदर्शनाखाली जोडरस्ता व पेट्रोलपंपाचे बांधकाम करणे पंपधारकास बंधन कारक राहील. सहा महिन्यात काम समाधानकारकपणे पूर्ण न झाल्यास अथवा पंपधारकाने अटी / शर्तीचे उल्लंघन केल्यास सदर बँक गॅरेंटी वटविण्यात यावी. ज्या पेट्रोलपंप धारकांनी जोड रस्त्याकरीता राज्य शासनाची परवानगी प्राप्त न करता पेट्रोलपंप कार्यन्वित केले आहे अशा पेट्रोल पंपाचा परवाना संबधित कार्यकारी अभियंता यांनी संबधित जिल्हाधिकारी यांच्या नजरेस हि बाब आणून त्यांना परवाना रद्द करण्याची विनंती करावी. जोड रस्त्याची परवानगी नसतांना पेट्रोलपंप सुरु राहिल्यास संबधित कार्यकारी अभियंता जवाबदार राहतील. तसेच पंपधारकाने रितसर परवानगी घेऊन त्यातील मंजूर नकाशानुसार बांधकाम पूर्ण केल्यानंतर व तशी खातरजमा कार्यकारी अभियंत्यांनी केल्यानंतर बँक गॅरेंटी परत करण्यात यावी.

हे आदेश सदर परिपत्रकाच्या दिनांकापासुन लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्र.रा. डिकवार

( प्र.रा.डिकवार)
कार्यासन अधिकारी

प्रत

मा. मंत्री, (सा.बां./सा.उ. व) यांचे खाजगी सचिव
मा. मंत्री, (सा.बां./सा.उ. ) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, (सा.बां.) यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव, महसुल विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव (रस्ते) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
सचिव (बांधकामे) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
सर्व कार्यासन अधिकारी, सा.बां.वि. मंत्रालय, मुंबई.
सहव्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नेपियन सी रोड, मुंबई.
सर्व मुख्य अभियंते (विद्युत वगळून),
सर्व अधीक्षक अभियंता/ सर्व कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, (विद्युत वगळून), /सर्व जिल्हापरिषद
सर्व महसूल आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
संचालक नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग, सेंट्रल बिल्डींग, पुणे.
सर्व महानगरपालिका/नगरपालिका,
निवड नस्ती, कार्यासन रस्ते-७.